# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१-०९

website - https://nagpur.dvet.gov.in ☎ ०७१२/२५६५५५५,२५६०८२३ फॅक्स क्र २५६१४०३

जाहिरात क्रमांक ०१/२०२० दिनांक :: ०८.०१.२०२०

## गट-क व ड संवर्गातील केवळ अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक व अर्हता प्राप्त उमेदवारांसाठी सरळसेवा भरती प्रक्रीया सन २०१९-२०२०

(महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र.बी.सी.सी.-२०१८/प्र.क्र.३०८./१६-ब, दिनांक २१ डिसेंबर,२०१९)

सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर सिव्हील लाईन, नागपूर यांचे अधिनस्त संस्था / कार्यालये येथे मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार राज्यात अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी - २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ नुसार कार्यवाही करणेबाबतचे निर्देश प्राप्त आहेत. त्याअनुषंगाने अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना, जाहिरातीत नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे दिनांक १६.०१.२०२० रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत हस्तदेय / टपालाद्वारे स्विकारण्यात येतील. अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर भरती प्रक्रियेसाठी निश्चित केलेला कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे असुन उपरोल्लेखित शासन निर्णयातील विहीत तरतुदी आणि निर्देशानुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधुन सरळसेवेने भरती करावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव व वेतनस्तर | एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | सर्व साधारण | एकुण |
| १ | **शिल्पनिदेशक (संधाता)**<br>**S-१४, रु.३८,६००-१,२२,८००** | ३ | १ | २ | ३ |
| | **शिल्पनिदेशक (तारतंत्री)**<br>**S-१४, रु.३८,६००-१,२२,८००** | २ | १ | १ | २ |
| | **शिल्पनिदेशक (आर.ए.सी.)**<br>**S-१४, रु.३८,६००-१,२२,८००** | १ | ० | १ | १ |
| | **शिल्पनिदेशक (सुतारकाम)**<br>**S-१४, रु.३८,६००-१,२२,८००** | १ | ० | १ | १ |
| २ | **कनिष्ठ लिपीक**<br>**S-६ रु.१९,९००- ६३,२००** | १ | ० | १ | १ |
| ३ | **चतुर्थ श्रेणी कर्मचारी**<br>**S-१, रु.१५,०००-४७,६००** | २ | ० | २ | २ |

## शैक्षणिक अर्हता व अनुभव ::

| | |
|---|---|
| **शिल्पनिदेशक** | (I) Possess<br>(a) A Diploma at least in Second Class in appropriate branch of Engineering or Technology of the Board of Technical Examinations, Bombay or its equivalent qualification.<br>**OR**<br>(b) Have passed the Secondary Schools Certificate Examination with Mathematics and Science or its equivalent Examinations; and possess either.<br>i) National Apprenticeship Certificate in the appropriate trade of the National Council for Training in Vocatioal Trades or its equivalent.<br>**OR**<br>ii) National Trade Certificate in the appropriate trade of the National for Training in Vocational Trades or its equivalent.<br>**OR**<br>iii) Trade Certificate in respective trade awarded by the State Council for Training in Vocational Trades of the Maharashtra.<br>**OR**<br>iv) Persons from Defence Service having basic qualifications and possessing Trade Certificate and two years experience in the respective trade in mentioned in sub-clause (ii) below:<br>**AND**<br>(II) Have practical experience in appropriate trade for a period of not less than four years including minimum period prescribed for training by the persons possessing the qualification mentioned in sub - clauses (a) and (b) (i),(ii) of clauses of this rule; and for persons possessing the qualifications mentioned in sub-clauses (b)(iv) of clause (I) of this rule, two years practical experience in appropriate trade after acquiring the qualifications in a respective trade in an industry of Government Department of Industrial Undertaking of Commercial concern of Corporation or Board established by Government.<br>**Provided that, preference may be given to the candidates who have successfully completed training in the Central Training Institute for the post of Instructors.** |
| **कनिष्ठ लिपीक** | १)सवैंधानिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने समतुल्य म्हणुन घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, तसेच<br>२)मराठी संगणक टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनीट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी संगणक टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र,(महराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या शासकीय परीक्षा मंडळाचे टंकलेखनाचे किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) |
| **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम,१९६५ (१९६५ चा महा.४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यांत येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा, शासनाने समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा. |

**अर्ज करतांना उमेदवारांनी लक्षात घ्यावयाच्या महत्वाच्या सुचना :**

१) उपरोक्त संवर्गातील सर्व पदे ही शासन निर्णय २१ डिसेंबर, २०१९ च्या अनुषंगाने सरळसेवेने भरण्यात येत आहेत.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. ( डोमेसाईल प्रमाणपत्र असणे आवश्यक.)

३) अनुसूचित जमातीकरीता असलेले आरक्षण केवळ महाराष्ट्र अधिवास असणाऱ्या उमेदवारांसाठीच लागु राहील.

४) महिलांचे आरक्षण महिला व बालकल्याण विभाग, शा.नि.क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास पुरुष उमेदवाराचा विचार केला जाईल.

५) शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही२००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दि.२८.०३.२००५ मधील नियम ४ प्रमाणे नमुना 'अ' मध्ये लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र भरुन (लागु नसल्यास लागु नाही असे नमुद करुन) व स्वाक्षरी करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) अर्ज करु इच्छिणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे अर्ज प्रत्यक्ष अथवा टपालाने A-४ साईज मध्ये जाहिरातीतील नमुन्याप्रमाणे प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. टपालाने पाठविलेल्या अर्जाचा लिफाफ्यावर अर्ज केलेल्या पदाचा क्र. व पदाचे नांव ठळकपणे लिहावे.

७) अर्जावर स्वत:चा अलिकडील फोटो लाऊन त्यावर स्वाक्षरी करावी. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र (आवश्यक), लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, संगणक अर्हतेचे प्रमाणत्र (D.O.E.A.C.C. सोसायटी अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.) इत्यादी व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपुर्ण समजुन नाकारला जाईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

८) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परिक्षा / व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. शिल्पनिदेशक, कनिष्ठ लिपीक या पदांसाठी सदर लेखीपरिक्षेतील एकुण गुणांचा तपशिल व परीक्षेचा स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| **पदनाम** | **लेखी परिक्षा** | | | | **व्यावसायिक चाचणी** | |
|---|---|---|---|---|---|---|
| **शिल्पनिदेशक** | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बोध्दीक चाचणी | संबंधित व्यवसायाच्या अभ्यासक्रमावर आधारित व्यावसायिक चाचणी | **एकुण** |
| **प्रश्न** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | **१००** |
| **गुण** | ३० | ३० | ३० | ३० | ८० | **२००** |

| **पदनाम** | **लेखी परिक्षेचे स्वरुप (विषय)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **कनिष्ठ लिपीक** | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बोध्दीक चाचणी | **एकुण** |
| **प्रश्न** | २५ | २५ | २५ | २५ | **१००** |
| **गुण** | ५० | ५० | ५० | ५० | **२००** |

तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी (गट-ड) या पदासाठी कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी उत्तीर्ण) च्यासमान दर्जाच्या शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांसाठी लेखी परिक्षेतील एकुण गुणांचा तपशिल व परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| **पदनाम** | **परिक्षेचे स्वरुप (विषय)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | अंकगणित | **एकुण** |
| **प्रश्न** | २५ | २५ | २५ | २५ | **१००** |
| **गुण** | ५० | ५० | ५० | ५० | **२००** |

**उपरोक्त परिक्षा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रध्दानंदपेठ, नागपूर येथे खालील वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.**

## वेळापत्रक

| **पदनाम** | **लेखी परिक्षा दिनांक व वेळ** | **व्यावसायिक चाचणी** |
|---|---|---|
| **शिल्पनिदेशक** | दिनांक २४.०१.२०२०<br>वेळ सकाळी ९ ते १०.३० वा. | दिनांक २४.०१.२०२०<br>वेळ सकाळी ११ ते १२.३० वा. |
| **कनिष्ठ लिपीक** | दिनांक २४.०१.२०२०<br>वेळ दुपारी १ ते २.३० वा. | **लागु नाही** |
| **चतुर्थ श्रेणी कर्मचारी** | दिनांक २४.०१.२०२०<br>वेळ दु.३ ते ४.३० वा. | **लागु नाही** |

९) जाहिरातीतील प्रत्येक पदासाठी नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव हे न्युनतम अर्हत व अनुभव दर्शवितात. तथापि,उच्च अर्हता व अनुभवाचे उमेदवार प्राप्त झाल्यास त्यांचाही विचार करण्यांत येईल.

१०) अनुभव :: महाराष्ट्र शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दिनांक ०३.०७.२००४ अन्वये अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अंशकालिन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन, प्रभारी, अतिरीक्त कार्यभार तत्वावर केलेल्या अंशकालिन सेवेचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही. संबंधित कामाच्या निगडीत अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्रातील संस्था/ आस्थापना शॉप ॲक्ट / फॅक्टरी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असावी व अनुभव प्रमाणपत्रावर संस्था / आस्थापनेचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, प्रत्यक्ष केलेल्या कामाचे स्वरुप व कालावधी व पद नमुद असणे आवश्यक आहे.

११) उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या दाव्यांच्या पृष्ठार्थ सर्व प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. अर्जाची छाननी केल्यानंतर कोणतेही प्रमाणपत्र स्विकारले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. अर्जासोबत जोडलेल्या नमुद सर्व प्रमाणपत्रांची छाननी केल्यानंतर परीक्षेसाठी सर्व पात्र व अपात्र उमेदवारांची पदनिहाय यादी **सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१** या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व https://nagpur.dvet.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक २०.०१.२०२०** रोजी सकाळी ११.०० वाजता लावण्यात येईल. या संदर्भात आक्षेप असल्यास आक्षेप दिनांक २१.०१.२०२० रोजी स्विकारण्यांत येतील व अंतिम यादी २२.०१.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.लावण्यांत येईल. स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेत तसेच व्यावसायिक चाचणी परिक्षेस बसता येईल. परिक्षेच्या वेळेस कोणतीही तक्रार घेतली जाणार नाही.

१२) उमेदवारांनी परिक्षेसाठीची ओळखपत्र **सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१** या कार्यालयाकडून **दिनांक २२.०१.२०२०** रोजी सकाळी ११.०० वाजल्यानंतर प्राप्त करुन घ्यावे.

१३) उमेदवार प्राथमिक टप्प्यावर पात्र झाल्यानंतरच त्यांची परिक्षा घेण्यांत येईल व या सर्व परीक्षांसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर राहणे आवश्यक राहील.

१४) जिल्हा रोजगार स्वयंरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी. शासनाच्या विविध सेवायोजन कायालयातील नोंदणीकृत उमेदवारांना सुध्दा स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

१५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनु.जमाती (सन - २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी, २००४ पासुन अंमलात आणलेला आहे.

१६) उमेदवारांनी विहीत नमुन्यातील संगणकीय टंकलिखीत अर्ज सादर करणे आवश्यक असुन अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी आर्जसोबत रु. १५०/- चा कोणत्याही **राष्ट्रीयकृत बँकेचा** धनाकर्ष (Demand Draft) हा **Account Officer, Vocational Education & Training, Regional Office, Nagpur** यांचे नावे काढलेला असावा व धनाकर्ष अर्जासोबत सादर करावा. अन्य नावाने काढलेला व राष्ट्रीयीकृत बँकेतुन न काढण्यांत आलेला तसेच कमी रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही परिक्षा शुल्क हा ना-परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव परीक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

१७) निवड झालेला उमेदवार हा नागपूर विभागातील कोणत्याही शासकीय संस्था / कार्यालयात नियुक्तीस व बदलीस पात्र राहील.

१८) शासकीय / निमशासकीय आस्थापनेतील उमेदवारांनी नियुक्ती अधिकाऱ्यांचे ना- हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१९) विहीत नमुन्यातील अर्ज उपरोक्त नमुद केलेल्या पत्त्यावर दर दिवशी सुट्टीचे दिवस धरुन सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष / पोस्टाने स्विकारले जातील. अर्ज स्विकृतीचा अंतिम **दिनांक १६.०१.२०२०** सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत असेल. अर्ज स्विकारणेबाबतची अंतिम तारीख काटेकोरपणे पाळण्यांत येईल. यात पोस्टाच्या दिरंगाईचा विचार केला जाणार नाही.

२०) वयोमर्यादा : किमान १८ व कमाल ४३ वर्ष असावी, तथापि, उच्च वयोमर्यादेची अट ही अपंग, माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालिन पदवीधर इत्यादी प्रवर्गासाठी प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे शिथीलक्षम केली जाईल.

२१) **दिनांक ०९.०१.२०२०** रोजी धारण केलेली शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा ग्राहय धरली जाईल.

२२) सदर भरतीसाठी अनु.जमाती या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतील.

२३) मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अटीस अधिन राहून उमेदवारास भरती प्रक्रीयेस पात्र ठरविण्यांत येईल. कोणतेही प्रमाणपत्र अवैध आढळल्यास आणि पदभरती संदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास संबंधित उमेदवारास भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यांत येईल.

२४) शासन निर्णय क्रमांक १००५/प्र.क्र.२९-भाग- नऊ, दिनांक २१.०१.२००६ अन्वये अतिरीक्त संवर्गाकडुन पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास व या खात्याच्या आढाव्याअंती अतिरीक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समायोजन / संबधित व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेश / संलग्नता न होणे तसेच शासनाचे धोरण बदलल्यास इत्यादी कारणांमुळे पदांची संख्या कमी झाल्यास त्यानुसार पदांची संख्या तसेच आरक्षणात काही प्रमाणात बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत अंशत: बदल करणे, परिक्षेला स्थगित करणे, पुढे ढकलणे वा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार **नियुक्ती प्राधिकारी** यांना राहील.

२५) निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती लपवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड / नियुक्ती भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल / शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यांत येईल.

२६) पदभरती प्रक्रीयेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत **सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१** यांना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील तसेच न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र नागपूर राहील.

२७) शासन निर्णय क्रमांक अनियो २००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

२८) वित्त विभाग परिपत्रक क्र.अनियो १००६/८७/सेवा - ४, दिनांक १२.०१.२००७ व वित्त विभाग परिपत्रक क्र. अनियो १००९/१३/सेवा -४, दिनांक २४.०२.२००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचाऱ्यास माहराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहील.

२९) परीक्षेकरीता येतांना ओळख पटविण्यासाठी उमेदवारांनी स्वत:चे पॅनकार्ड / आधार कार्ड / वाहन चालविण्यांचा परवाना / पासपोर्ट, मतदान ओळखपत्र यापैकी कोणतेही एकाची मुळप्रत व १ छायांकित प्रत सोबत आणावे.

३०) अधिक माहितीकरीता दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६५५५५ / २५६१४०३ यावर संपर्क करावा.

**सही /-**

**नियुक्ती प्राधिकारी तथा सहसंचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण**
**प्रादेशिक कार्यालय,नागपूर**

# अर्जाचा नमुना

## गट क व ड संवर्गातील केवळ अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक व अर्हता प्राप्त उमेदवारांसाठी सरळसेवा भरती प्रक्रीया सन २०१९-२०

**अर्ज नोंदणी क्रमांक (कार्यालयीन वापराकरीता) : ------------**

उमेदवाराचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो)

(उमेदवाराने फोटो स्वत: साक्षंकित करावा)

प्रति,

**सहसंचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण**
**प्रादेशिक कार्यालय, नागपूर. ४०० ००१ - ०९**

विषय :- ------------------------------------------------------------------- या पदासाठी अर्ज.

१. वैयक्तिक माहिती :
उमेदवाराचे नाव : ------------------------------------------------------------------------------------------------------------
आडनाव स्वत:चे नाव वडीलांचे / पतीचे नाव

२. लिंग पुरुष/ स्त्री (लागू नसेल ते खोडावे)

३. पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता : (पिनकोड क्रमांकासह ) --------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

४. अ) मोबाईल क्रमांक ब) Whats App no. क) इमेल आयडी :

५. प्रवर्ग व जात ------------------------------------------------------------------------------------------------------------

६. जात वैधता प्रमाणपत्र तपशिल - **आहे / नाही.**
तपशिल- जात वैधता क्रमांक -------------- दिनांक ------------

७. जन्म तारीख ------------------------------------------------------------------------------------------------------------
(वयाचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्यावर नोंद केल्याप्रमाणे )

८. दिनांक ०९.०१.२०२० रोजीचे वय -------------------- वर्ष ----------------------- महिने ---------------------

९. विवाहित / अविवाहित ------------------------------------------------------------------------------------------------------------

१०. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक व तारीख (असल्यास )----------------------------------

११. धनाकर्ष क्रमांक (D.D. No.) ----------------- दिनांक ---------------रक्कम ----------------- बँकेचे नाव ------------------

१२. (D.D. In Favour of Account Officer, Vocational Education and Training, Regional Office, Nagpur, Payable at Nagpur)

१३. शैक्षणिक अर्हता : (एस. एस.सी पासुन पुढे )

| अ.क्र. | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | शाळा/ विभागीय मंडळ/ एनसीव्हीटी/ सीआयटीएस (सीटीआय)/ विद्यापीठ/ संस्था इ. | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१४. अनुभव :

| अ. क्र. | शासकीय/अशासकीय/ अशासकीय/ आस्थापनेचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी | सेवेचा कालावधी | | | | नियमित / कंत्राटी /हंगामी / अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महिने | |
| | | | | | | | | |

१५. विहीत संगणक अर्हता उत्तीर्ण **: होय/ नाही**

१६. उमेदवारा विरुध्द विभागीय चौकशी चालु/ प्रलंबित / प्रस्तावित आहे काय ? **: होय / नाही**

१७. उमेदवारा विरुध्द न्यायालयीन व इतर प्रकरणे, फौजदारी खटला होऊन शिक्षा झाली / प्रलंबित आहे काय ? **: होय / नाही**
असल्यास तपशिल नमुद करावा.

**( उमेदवाराची सही व संपुर्ण नाव )**

# <u>हमीपत्र</u>

मी याद्वारे जाहिर करतो / करते की, माझ्या माहिती व ज्ञानानुसार वरील तपशिल सत्य व अचुक आहे. कोणताही तपशिल खोटा आढळल्यास माझी उमेदवारी / नियुक्ती रद्द झाल्यास अथवा होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र असेल. अर्ज परीपुर्ण नसल्यास अथवा पृष्ठार्थ आवश्यक कागदपत्रे नसल्यास अर्ज रद्दबातल ठरविला जाईल व त्याबाबत मला काही कळविले जाणारनाही याची मला जाणिव आहे. मी प्रतिज्ञा पुर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक व विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावण्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमदेवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार / हरकत राहणार नाही. जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला त्या मान्य आहेत.

ठिकाण ::
दिनांक ::

**अर्जदाराची सही**
**संपुर्ण नाव -**

<u>सोबत जोडलेली प्रमाणपत्रे ::</u>

१) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
२) वयाचा पुरावा
३) जातीचे प्रमाणपत्र
४) जात वैधता प्रमाणपत्र
५) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र
६) अनुभवाचा पुरावा
७) संगणक हाताळणी / वापराबाबतचे प्रमाणपत्र
८) वय / राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र
९) इतर आवश्यक प्रमाणपत्र

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन), नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ

# प्रतिज्ञापन

**नमुना -अ**

**(नियम ४ पहा)**

मी श्री/ श्रीमती / कुमारी / ------------------------------------------------------------------------------------------------------------------------

श्री ----------------------------------------------------------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी,

वय --------------------वर्षे, राहणार ------------------------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१. मी ----------------------------------------------------------------या पदारसाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला --------------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा. )

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** **स्वाक्षरी**

**संपुर्ण नाव -**

..............................................................................................................................................................

## <u>ओळखपत्र</u>

| | |
|---|---|
| १) पदाचे नाव : ----------------------------------------------------------------<br>२) उमेदवाराचे संपुर्ण नांव : ----------------------------------------------------------------<br>३) **परीक्षेचा आसन क्रमांक** : ----------------------------------------------------------------<br>४) परीक्षा केंद्र : ----------------------------------------------------------------<br>५)परीक्षेचा दिनांक व वेळ : ----------------------------------------------------------------<br>६) उमेदवाराची नमुना स्वाक्षरी :<br><br>**(ओळखपत्रातील क्रं. ३ वरील माहिती वगळुन इतर माहिती उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी स्वत: भरावी)** | उमेदवाराचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र (फोटो)<br><br>**(राजपत्रित अधिकारी/ विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेमार्फत साक्षांकीत करणे आवश्यक आहे. )** |